# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्र.३४ दि.०४/११/२०२२
## सभा क्र.४६,दिनांक ०९/११/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची (तहकुब) सभा बुधवार, दिनांक ०९/११/२०२२ रोजी, दु. ४ : ०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिकाभवन,पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**वृत्तांत कायम करणे**

मा. स्थायी समिती सभा क्र. ४४, दि. ०१/११/२०२२ व सभा क्र. ४५, दि. ०४/११/२०२२ असे एकूण ०२ वृत्तांत कायम करण्यात आले.

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.१०१९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे दि. ०१/०९/२०२२ ते दि. ३०/०९/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/५५६९, दि. ३१/१०/२०२२चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.१०२०**

Selection of contract for mechanized cleaning of public toilets(PT) community Toilets (CT) and urinals using small vehicle mounted high pressure jetting machine for a period of three plus two (extendable) year for zone 4 कामीटेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लोकराज्य स्वयं रोजगार सेवा सहसंस्था यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ६,४६,९९,३००=८०पेक्षा११.९९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५,६९,४१,८५४=६३४ पर्यंत काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/८१७,दि. २/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०२१**

Selection of contract for mechanized cleaning of public toilets (PT) community Toilets (CT) and urinals using small vehicle-mounted high pressure jetting machine for a period of three plus two (extendable) year for zone 5 कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिद्धीविनायक एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.७,७४,१४,२४१=५० पेक्षा ११.९९०% कमी) असल्याने त्यांचे कडून र.रु. ६,८१,३२,२७३=९४४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.५/८१८,दि. २/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०२२**

Selection of contract for mechanized cleaning of public toilets (PT) community Toilets (CT) and urinals using small vehicle-mounted high pressure jetting machine for a period of three plus two (extendable) year for zone ३ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.लोकराज्य स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.९,०६,९१,४८०/–पेक्षा–११.९९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७,९८,१७,५७२=३४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.३/८१९,दि. २/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र.१०२३**

कोथरूड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पद्धतीने करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ६,८०,८९,०४५=४४० पेक्षा ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६,८०,८९,०४५=४४० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्यातील भाववाढ अदा करणेस सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामाचा कालावधी माहे दि.२४ एप्रिल २०२२ पासून गृहीत धरणेस व त्यानुसार काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस व बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/७३२, दि. १२/१०/२०२२ चे पत्र. ( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०२४**

शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पद्धतीने करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲण्ड सिस्टीम प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र. रु.३,३१,१७,२४०/-पेक्षा ॲटपारदराने ) असल्याने त्यांचेकडून र. रु. ३,३१,१७,२४०/- पर्यंतकाम करूनघेणेस व त्यांचेशीकरारनामाकरणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ अदा करणेस तसेच निविदा उघडल्याचे दिनांकापासून काम करून घेणेस व त्या दिवसापासून बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.२/७३३, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय :-सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०२५**

औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊटसोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्रियांक एंटरप्रायझेस यांचेटेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. १०,५९,७५,१६८/-पेक्षा ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. १०,५९,७५,१६८/- पर्यंतकाम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने आऊटसोर्सिंग कचरावेचक कंत्राटी कामगारांचे दिनांक १६/५/२०२२ पासून वेतन अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस व देयक अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.२/७३४, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.
( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१०२६**

महापालिका सहाय्यक आयुक्त धनकवडी सहकारनगर कार्यालया अंतर्गत झाडण कामाकरिता मजुर पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./ श्री.Priyank Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ९,४३,१७,८९९=५२ पेक्षा (०.००% ॲटपार) दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९,४३,१७,८९९=५२ नुसार उपलब्ध तरतुदी पर्यंत काम करून घेणेस तसेच मे.शासनाकडून किमान वेतनदरातील विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार फरक अदा करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७३६, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१०२७**

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय वारज कर्वेनगर अंतर्गत आऊटसोर्सिंगने कचरा संदर्भात कामे करून घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. प्रियांक एंटरप्रायझेस यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. ९,३०,२१,२३२=२०पेक्षा ०.००% ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९,३०,२१,२३२=२० पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/७४०, दि. १२/१०/२०२२ चे पत्र.( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेतकरण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१०२८**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिट नोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिटनोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी-२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्यान`त्यांचेकडून र.रु. ८२,८४,७५४/- अधिक जी.एस.टी. पर्यंतअदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचेजा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.
( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.१/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१०२९**

लक्ष्मीरस्ता दुभाजक दुरूस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टिक पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोनदुरूस्ती व पेंटिंग तसेच रस्ते देखभाल दुरूस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. साईलिला कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु. ३५,२४,०८१/- पेक्षा १.००%कमी) असल्याने त्यांचे कडूनर.रु. ३४,८८,८४०=१९ पर्यंतकाम करून घेणेस अधिक जी.एस.टी.र. रू. ६,२७,९९१=२३ पर्यंत अधिक लेबर सेस र.रू. ३५,२४१/- पर्यंत अधिक वर्कर इन्शुरन्स र.रू. १७,६२०/-(असे एकूण र.रू. ४१,६९,६९२=४२ ) पर्यंत काम करणेस व त्यांचे बरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचेजा.क्र. मआ/पथ/५८३,दि. २०/९/२०२२ चे पत्र.
( टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र.१०३०**

पुणे मनपाच्या पौड व घोलेरोड कचरा हस्तांतरण केंद्रावरून पुणे मनपाच्या कोणत्याही कचरा प्रक्रिया प्रकल्पांपर्यंत घनकचऱ्याची सेकंडरी वाहतूक भाडेतत्वावरील ३१ मे. टन जीव्हीडब्ल्यू, २८ क्यु.मी. क्षमतेच्या बी.आर.सी. वाहनाच्या साहाय्याने करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणेयांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रू. ४,५९,४४,०१०/- पेक्षा ५% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,८२,४१,२१०=५० पर्यंत करणेकामी मान्यता मिळणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा. क्र मआ/मोवावि/३००,दि. १५/७/२०२२ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३१**

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड-१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३२**

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीयसंस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणेयाकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/पथ/७११ दि.११/१०/२०२१ चे पत्र.
१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५अन्वये पारित केलेला ठराव निरस्तकरणेस.
२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विदयुत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्तापुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुन पुणे महानगरपालिकेमार्फतदरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३३**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्यासभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३४**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहती मध्ये राहणाऱ्या ( रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित ) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे / लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबतमा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३५**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३६**

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.
( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )
**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३७**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक / खाजगी / सरकारी / निमसरकारी संस्था / मंडळे / मा.सभासद / लोकप्रतिनिधी इत्यादी कडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी

सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिकाउद्यान विभागामार्फत भाडयानेदेण्यात येणाऱ्याकुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br><br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br><br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

( टीप – सदर विषयाचा विचार पुढीलसभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३८**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेश शुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेश शुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय : सदर विषयाचा विचार ८ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. १०३९**

१५ व्या वित्तीय आयोग अंतर्गत पुणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीमधून पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणे करिता टिपर खरेदीकरणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एक्सेलव्हेईकल्स अ युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र. रु. ५,८७,८२,३७५/– पेक्षा २५.६० % जास्तव पूर्वगणनपत्रक (ज्या मध्ये जीएसटी चा समावेश आहे) रक्कमेपक्षा (+) १६.१७ % जास्त) असल्याने १ नग करिता रक्कम रू. १९,२९,०३७=४१ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार रक्कम रू. २२,७६,२६४=१४ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह याप्रमाणे ३० नग ९ क्यू.मी.क्षमतेचे टिपर करिता र.रू.५,७८,७१,१२२=२८ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार र.रु. ६,८२,८७,९२४=२९ जीएसटी, वाहतूक,आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासहखरेदीकरणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/६८४,दि. २९/९/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १/११/२०२२ च्यासभेत ठरले होते. )

**निर्णय : सदर विषयाचा पुढील सभेत विचार करण्यात यावा.**

<u>**संकीर्ण**</u>

**विषय क्र.१०४०**

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित"या अशासकिय संस्थेबरोबर दि.२६/१०/२०२२ पासून पुढील कालावधीसाठी करार करणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा.महानगरपालिका सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घनकचरा/८०७, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

१) मा. महापालिकाआयुक्त यांनी त्यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या वरील क्र. १ ते ३३ बाबींस मान्यता मिळणेस.

२) पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी"स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित" या अशासकिय संस्थेबरोबर दि.२५/१०/२०२२ पासून पुढील कालावधीसाठी सदर संस्थेकडून कामे करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

**३)** स्वच्छ सहकारी संस्थेला देखरेख व व्यवस्थापन, प्रशिक्षण व नागरिकांमधील जनजागृतीचा खर्च, आवश्यक सेवकवर्गाचे मानधन, महानगरपालिकेशी समन्वय साधणे, क्षेत्रिय कार्यालयांशी समन्वय साधणे, प्रभागनिहाय आरोग्य कोठीवरील सेवकांशी समन्वय साधणे, जनजागृती मोहीम व प्रशिक्षण इ. बाबींसाठी सन २०२२-२३ या कालावधीसाठी **RE19A164** या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून मिळणेस व प्रथम वर्षी र.रु. ४,९६,७०,७१२/-, इतका खर्च करणेस व त्यापुढील कालावधीसाठी एकूण पगारापोटीच्या वार्षिक खर्चात दर वर्षी ४% वाढ करणेस व दर वर्षी र.रु.२३,६५,२७२/- प्रशासन, जनजागृती, प्रशिक्षण, फोन, प्रवास, सॉफ्टवेअर, गणवेष व इतर तदनुषंगिक खर्चाच्या अनुषंगाने RE19A125 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून मिळणेस व खर्च देणेस.

**४)** दि.२५/१०/२०२२ पासून पुढील कालावधीत ढकलगाडी दुरुस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रु.५०/- याप्रमाणे प्रती वर्षाकरीता र.रु.६००/- आदा करणेस व RE19A125 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

**५)** कचरा वेचकांसाठी आवश्यकतेनुसार व ठराविक वारंवारतेमध्ये सुरक्षा प्रावरणे, ढकलगाड्या व बकेट देणे यासाठी सन २०२२-२३ व पुढील कालावधीसाठी RE19A144 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

६) स्वच्छ संस्थेच्या कचरा वेचकांकडून खालीलप्रमाणे सेवाशुल्क नागरिकांकडून आकारणेस.

अ. वर्गीकृत कचरा गोळा करण्यासाठी प्रत्येक घरापाठीमागे दर महा र.रु. ८०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये ५ **%** वाढ करणेस.

आ. झोपडपट्टी भाग, एस.आर.ए. मिळकती व अघोषित वस्त्यांमध्ये प्रति झोपडी दर महा र.रु. ६०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये ५ % वाढ करणेस व प्रत्येक कचरा वेचकास प्रति झोपडी प्रति महिना र.रु.२०/- प्रोत्साहन भत्ता **(slum subsidy)** म्हणून देणेस. यासाठी सन २०२२-२३ ते पुढील कालावधीसाठी RE19A116 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.

इ. व्यावसायिकांकडून निर्माण होणा-या कच-याचे संकलन करणेसाठी प्रति व्यावसायिक धारकाकडून दर महा र.रु. १६०/- इतके शुल्क आकारणेस व पुढील प्रत्येक वर्षाकरीता सेवाशुल्कामध्ये १० % वाढ करणेस.

७) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

८) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबण्याचा निर्णय घेणे व पर्यायी व्यवस्था उभारण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

९) पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून पुणे महानगरपालिकेतर्फे आवश्यकतेप्रमाणे स्वच्छ सहकारी संस्थेच्या सभासदांना साहित्य, हातगाड्या, देखभाल-दुरुस्ती खर्च, प्रशासकीय खर्च, गणवेश, संरक्षक हातमोजे, विमासंरक्षण, अत्यावश्यक साहित्य/सुविधा इ.बाबी आवश्यकतेप्रमाणे अदा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

१०) मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणेस.

**मा.प्रशासक :** या विषयामध्ये, **''अ.क्र.१ मध्ये दि.२५/१०/२०२२ पासून १ वर्षासाठी सदर संस्थेकडून कामे करून घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस.** तसेच **अ.क्र.४ मध्ये दि.२५/१०/२२ पासून १ वर्षासाठी ढकलगाडी दुरूस्ती करीता प्रति महिना प्रति कचरा वेचक र.रू.५०/– या प्रमाणे प्रतिवर्षी ६०० रू.अदा करणेस व व RE19A125 या अर्थशिर्षकावर आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस.''** अशी दुरूस्ती करून हा विषय मान्य करावा.

**निर्णय :–सदर विषयामध्ये अ.क्र.१ व अ.क्र.४ मध्ये वरीलप्रमाणे दुरूस्ती करून मान्य करून मा. मुख्यसभेकडे शिफारस करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४१**

वारजे स.नं. १३३ पार्ट दिगंबरवाडी शामराव बराटे विद्यालयाचे वाढीव मजल्याचे काम करणेसाठी र.रू. १०० लक्ष खालील प्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/८०८, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,भवन विभाग,पुणे महानगरपालिका,<br>भारतरत्न अटलबिहारीवाजपेयीवैद्यकीय महाविद्यालय,<br>बजेटकोड नं. CE17A242/SJ6-93, | र.रू. १०० लक्ष | --- |
| नवीनसुचविलेलेकाम<br>भवन विभाग, पुणे महानगरपालिका,<br>वारजेस.नं. १३३ पार्ट दिगंबरवाडी शामराव बराटे विद्यालयाचेवाढीव मजल्याचेकाम करणे. | --- | र.रू. १०० लक्ष |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४२**

मा. माजी सभासद पुणे महानगरपालिका यांची वैद्यकीय सहाय्य योजनेची आर्थिक तरतूद संपुष्टात आल्याने वर्गीकरणाद्वारे र.रू. २ कोटी खालीलप्रमाणे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/८०९, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

१) सदर वर्गीकरणास प्रशासकीय मान्यता मिळणेस,

२) सदर वर्गीकरणास रू. २,००,००,०००/– (अक्षरी :– र.रू. दोन कोटी फक्त ) उपलब्ध तरतूदीतून मा.माजी सभासद यांचे औषध उपचाराच्या खर्चाचे अंशतः बिले व पॅनेलवरील हॉस्पिटल येथे दाखल झालेल्या मा. माजी सभासदांची बिले आदा करणेस.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>७– रूग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये इ. RE17F153C, क.सेवकांसाठी आरोग्य सहाय्य योजना ब. मनपा सभासदासाठी रिएम्बेर्समेंट | र.रू. २ कोटी | --- |
| नवीन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>सन २०२२–२०२३, ७– रूग्णालये प्रस्तुतीगृहे औषधालये इ.<br>RE17F153E,माजी सभासादासाठी वैद्यकीय सहाय योजना. | --- | र.रू. २ कोटी |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४३**

पुणे मनपाच्या १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये गणेशोत्सव २०२२ साठी फिरते विसर्जन हौद पुरविणे या कामाकरिता कमी पडणारी रक्कम रुपये १ कोटी ५ लक्ष रूपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.

महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/ ८१०, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

१) घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद तक्ता 'अ' मधील शिल्लक राहणाऱ्या रक्कमेमधून र.रू. १,०५,००,०००/– ( अक्षरी र.रू. एक कोटी पाचलक्ष ) मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद तक्ता ब मधील कामासाठीचे RE19A161 या अर्थशिर्षकावर वर्गीकरणाने उपलब्ध होणेस.

२) निविदेतील प्राप्त दर व सदर कामासाठी मा. स्थायी समितीची मान्यता मिळाले नंतर सदर कामाच्या रक्कमेमध्ये अल्प फेरफार झाल्यास त्यानुसार आवश्यक तरतूद उपलब्ध करून देणेस मा. महापालिका आयुक्त यांना अधिकारी प्रदान करणेस.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका,<br>१) गणपतीउत्सवासाठी अमोनियम बायकार्बोनेटखरेदीकरणे. ( RE19A159) | र.रू. ०.५० कोटी | --- |
| २) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आराखड्यानुसार भाडेतत्वावर छोट्या व मोठ्या घंटागाड्या व कॉम्पाक्टर आऊटसोर्सिंगतत्वावर भाड्यानेघेणे.( RE19A166) | र.रू. ०.५५ कोटी | --- |
| सुचविलेले काम<br>घनकचराव्यवस्थापनविभाग, पुणे महानगरपालिका,<br>गणपतीउत्सवासाठी आवश्यक कामेकरणे.( RE19A161) | --- | र.रू. १ कोटी ५ लक्ष |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४४**

पुणे पेठ एरंडवणा येथील गुळवणी महाराज रस्ता (गोडसे चौक ) ते कर्वे रोड (नळ स्टॉप मेट्रोस्टेशन) दरम्यानचा १२ मी. डी.पी. रस्ता विकसित करणेसाठी कमी पडणारी रक्कम रूपये ४,४७,४२,०००/– चे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र. मआ/पथ/ ८११, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ)कार्यालय,CE20A1248/ A 5-1<br>शहरातील प्रमुख डी.पी.रस्त्यांच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणे . | र.रू.४,४७,४२,०००/– | --- |
| नवीन सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (पथ) कार्यालय<br>पुणे पेठ एरंडवणा येथील गुळवणी महाराज रस्ता (गोडसे चौक) ते कर्वे रोड (नळ स्टॉप मेट्रोस्टेशन) दरम्यानचा १२ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे | --- | र.रू.४,४७,४२,०००/– |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४५**

पर्यटन सांस्कृतिक व धार्मिक दृष्टया महत्वाच्या शहरामध्ये१५ ठिकाणी आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणेसाठी कमीपडणारी रक्कम रूपये– ३ कोटी २० लक्ष रूपये खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचेजा.क्र. मआ/घनकचरा/८१२, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,घनकचरा व्यवस्थापन विभाग,<br>पुणे महानगरपालिका, कचरा वाहतुकसाठी नव्याने उपनगरांमध्येरॅम्प उभारणी व विकास कामे करणे . CE19A156 | र.रू.३ कोटी २० लक्षरूपये | --- |
| **<u>सुचविलेले काम</u>**<br>घनकचरा व्यवस्थापन विभाग,<br>पर्यटन सांस्कृतिक व धार्मिक दृष्टया महत्वाच्या शहरामध्ये १५ ठिकाणी आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणे.CE19A173. | --- | र.रू.३ कोटी २० लक्ष रूपये |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४६**

पुणे महानगरपालिका विधी विभागातील सन २०२२–२३ चे अंदाजपत्रक RE11Q102 संकीर्ण या अर्थशिर्षकावर र.रू. १५,००,०००/–खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचे जा.क्र. मआ/विधी/ ८१३, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,विधी विभाग,पुणे महानगरपालिका,<br>RE11Q103 दावे खटले न्यायालयीन खर्च | र.रू.१५ लक्ष | --- |

| नवीन सुचविलेले काम<br>विधीविभाग,पुणे महानगरपालिका,<br>RE11Q102 २.संकीर्ण | --- | र.रू.१५ लक्ष |
|---|---|---|

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४७**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मांजर पाळणाऱ्या नागरिकांना परवाना घेताना कुत्र्यास आकारण्यात येणारी फी माजरांना आकारण्यासाठी खालील बार्बीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/८१४, दि . ३१/१०/२०२२ चे पत्र.

१) कुत्रा परवाना धोरणानुसार मांजरीचा परवाना काढणेस.
२) कुत्रा परवान्या प्रमाणे परवाना पुस्तक व बिल्ला उपलब्ध करून देणेस.
३) वर्तमानपत्रात जाहीर प्रकटनाद्वारे जनजागृती करणेस.
४) खालील तक्त्यानुसार फी आकारण्यास व त्यानुसार कागदपत्रे उपलब्ध करून घेणेस.

**मांजरीना आकारण्यात येणाऱ्या फी तक्ता**

| अ.क्र. | मांजर परवाना देताना आवश्यक लागणारी कागदपत्र | १ वर्ष कालावधीसाठी आकारण्यात येणारी परवाना फी | प्रतीवर्षी नूतनीकरण फी |
|---|---|---|---|
| १. | १.नागरिकाचा पत्याचा पुरावा. | ४०/– परवाना फी<br>+<br>१०/– बिल्ला फी | २५/– |
| | २. अॅटीरेबीज लसीकरण प्रमाणपत्र. | | |
| | ३. मांजराचा फोटो | ५०/– एकूण फी | |
| २. | प्रती वर्षी नूतनीकरण फी | – | २५/– |

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४८**

पुणे महानगरपालिका आणि श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने' आग्र्याहून सुटका स्मृतिदिन 'सोहळा किल्ले राजगड येथे साजरा करणेसाठी र.रू. २,९९,०००/– इतकी देणगी खालील अर्थशिर्षकातून अदा करणेसाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ८२९, दि. ३१/१०/२०२२ चे पत्र.

सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेखवसुलीवगैरे,
   क. महानगरपालिका व स्थायी समिती,
१. नगरसचिव यांचे कार्यालय, पान नं. १३९, यादी क्र. ठ२,
२. RE11A275/R2-3,श्री शिवाजीमहाराज आग्राहून सुटून परत आले तो स्मृती दिन साजरा करणे.
३. मान्य तरतूद रक्कम रूपये– ५,१५,०००/–

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०४९**

पुणे मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर टि एन एस डिझाईन्स एल एल पी ( आर्कि. शिबानी जाधव व आर्कि. तीर्था मिसाळ ) या संस्थेसपुणे मनपाचे मान्य आर्किटेक्ट पॅनेलवर समाविष्ट करून संबंधित कामाच्या पुर्वगणीत टेंडर रकमेच्या जीएसटी कर, रॉयल्टी कर व मटेरिअल टेस्टिंग चार्जेस वगळून जास्तीत जास्त२.०% या दराने मुशाहिरा मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद केलेल्या अ.क्र. १ ते १३ अटी शर्ती यांना अधिन राहून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/८२०, दि. २/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय :–सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**सही /– xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**